**इमहाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित**
**ग्राहक तक्रार निवारण मंच**
**कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर**

MAHADISCOM
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

सं.क्र.काअ/ग्रातनिमं/कोप/केस क्र. ४८/२०१८-१९/ 26 दिनांक: ३१.०१.२०१९

**आदेश**

**आदेश केस क्र. ४८(२०१८-२०१९)**

| | | |
|---|---|---|
| | मेंसर्स इंटीग्रेटेड एनर्जी इंजिनिअरींग<br>पंचतारांकित औद्योगिक वसाहत<br>कागल ता. कागल जि. कोल्हापूर | **अर्जदार** |
| | **विरुध्द** | |
| १) | कार्यकारी अभियंता (का) तथा नोडल ऑफीसर,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>मंडल कार्यालय, कोल्हापूर | **पक्षकार** |
| २) | कार्यकारी अभियंता<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>ग्रामिण विभाग-२ | |
| ३) | उपकार्यकारी अभियंता<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>उप विभाग कागल | |

**कोरमः-**१.श्री ए.व्ही. देशपांडे, अध्यक्ष
२.श्री. एन.बी.बारशिंग सदस्य सचिव,
३. श्री. पी. एस. पुजारी, ग्राहक सदस्य,

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, KOLHAPUR ZONE
MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD.
महावितरण

**न्यायनिर्णय**

मी ए.व्ही. देशपांडे अध्यक्ष, ग्राहक तक्रार.निवारण मंच. कोल्हापूर, खालीलप्रमाणे निर्णय देत आहे.

प्रस्तुतची तक्रारदाराने अंतर्गत तक्रार निवारण कक्षाच्या दिनांक २६.०४.२०१८च्या आदेशाने व्यथित होऊन दाखल केलेली आहे.

**गा-हाण्याचे संक्षिप्त स्वरुप.**

तक्रारदाराचे थोडक्यात कथन असे की, तक्रारादार प्लॉट क्र. D-३७३ पंचतांकिरत औद्योगिक वसाहत कागल जि.कोल्हापूर येथे वर नमूद नावाने उद्योग चालवितो त्यांचा महावितरण ग्राहक क्रमांक २५१०१०९६७१६६ असा आहे. एएआरआर/एनडीडीएफ/सीसी अॅन्ड आरएफयोजने अंतर्गत मंजूर रक्कमेमधून मासिक वीज बिलाची रक्कम अदा होत नाही. वीज बिलाची काही रक्कम या रक्कमे मधून वजा झाल्यास उर्वरीत बिल अदा करणे सोईचे होईल. या संदर्भात वि.प. विज वितरण कंपनी यांच्या उपविभागीय कार्यालय कागल यांच्याशी पत्रव्यवहार करण्यात आला होता. तरी देखील एनडीडीएफची रक्कम वजा झालेली नाही. जो पर्यन्त वजा होत नाही तो पर्यन्त आम्ही वि.प. विज वितरण कंपनीचे बिल भरु शकत नाही, त्यावर लवकरात लवकर कारवाई करण्यात यावी अशी तक्रारदाराची यांची मागणी या मंचाकडे आहे.

**वि. प. यांची भूमिका.**

प्रस्तुत प्रकरणाची नोटीस बजावल्यानंतर वि.प. कंपनीने हजर होऊन आपले म्हणणे खालील प्रमाणे मांडलेले आहे.मेंसर्स इंटीग्रेटेड एनर्जी इंजिनिअरींग यांची पंचतारांकीत एम.आय.डी.सी. मध्ये ड-७३ येथे औद्योगिक जोडणी असून त्यांचा ग्राहक क्र. २५१०१०९६७१६६ आहे. ग्राहकांचे खाते उतारा (सी.पी.एल.) तपासले असता दिनांक १५.०२.२०१७ रोजी सदर ग्राहकास वीज जोडणी दिलेली आहे. खाते उतारा (सी.पी.एल.) पाहता ग्राहकास माहे फेब्रुवारी २०१८ रोजी NDDF प्रस्तावाचा पहिला हप्ता दिलेला आहे. वि. प. विज वितरण कंपनीच्या मुख्य अभियंता (वितरण) मुख्य कार्यालय मुंबई यांचे पत्र क्र. CE/(Dist)/D-III/Non DDF Stoppage/009245 दिनांक २३.०४.२०१८ च्या पत्रानुसार सर्व NDDF परतावा प्रस्ताव पुनश्च लेखा परीक्षण करणे करिता तात्पुरत्या स्वरुपात थांबिविणेत आलेली आहेत. सदर प्रस्ताव मंजूरी करिता पाठविण्यात आलेला आहे. सदर प्रस्ताव मंजूर झालेनंतर सदर ग्राहकास NDDF परतावा देण्यात येईल असे वि.प. कंपनीच्या लेखी म्हणेण्यामध्ये सादर करण्यात आलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणाची सुनावणी आज दिनंक १८.०१.२०१९ रोजी घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी तक्रारदारातर्फे श्री विकास घोडके तर वि.प. कंपनीतर्फे श्री संजय पवार अतिरिक्त कार्यकारी अभियंता ग्रामिण विभाग-२ कोल्हापूर श्री गणेश पोवार, उपकार्यकारी अभियंता उपाविभाग कागल हे हजर होते. त्यांचा युक्तिवाद ऐकून घेण्यात आला. सदर प्रकरणामध्ये सुनावणी दरम्यान विज वितरण कंपनीने असे कुठेही नाकारलेले नाही की, ग्राहकाचा N.D.D.F. अंतर्गत सर्व परतावा देणार नाही. तसेच विज वितरण कंपनीचे लेखी पत्राद्वारे दिलेल्या म्हणण्यामध्येही ग्राहकाचा परतावा हा लेखा परिक्षण करणेसाठी तात्पुरता थांबविणेत आलेला आहे. लेखा परीक्षण झालेनंतर ताबडतोब उर्वरीत परताव्याचा प्रस्ताव मंजूर करुन ग्राहकाला दिला जाईल असे मान्य केलेले आहे. तसेच अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, मंडल कार्यालय, कोल्हापूर यांनी ही त्यांच्या दिनांक १०.सप्टेंबर २०१८ च्या आदेशात १५ दिवसाच्या आत लेखा परीक्षण करुन परतावा देण्यात यावा असे म्हटलेले आहे. ग्राहकाची तक्रार एवढीच आहे की, त्यांना परताव्याची रक्कम लवकरात लवकर मिळून ती मासिका बिलामधून वजा व्हावी. सबब वरील सर्व बाबींची दखल घेऊन आम्ही खालील प्रमाणे आदेश पारित करीत आहोत.

MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD.
KOLHAPUR ZONE
महावितरण

## आदेश

१) ग्राहकाची तक्रार मंजूर करण्यात येत आहे.

२) ग्राहकाचा प्रलंबित NDDF परतावा प्रस्ताव परिमंडल कार्यालयाकडून दिनांक १५ फेब्रुवारी २०१९ पर्यन्त मंजूरी घेऊन त्यांना सदर रक्कमेचा परतावा देण्यात यावा.

३) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

४) या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स,बांद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे करता येईल

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

( पी.एस. पुजारी) ग्राहक सदस्य

( N.B. धारशिंग) सदस्य सचिव

(ए.व्ही. देशपांडे) अध्यक्ष

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, KOLHAPUR ZONE
MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD.
महावितरण